



Postal Registration No- SRP/127/2024-26
RNI No. MAH/MAR/2015/74917
विकासाचा पुरस्कार - अन्यायाचा तिरस्कार
dainikpravarateer01@gmail.com
9970 96 8399
सायं. दैनिक प्रथम पब्लिकेशन
# प्रवरातीर
मुख्य संपादक : शिवपालसिंह प्र. ठाकुर 9372013375
संपादक : धिरजसिंह शिवपालसिंह प्र. ठाकुर 9970968399


आता कुठे म्हाळुंगी नदीला पाणी येऊन पूर्ण खड्डे भरून स्वच्छ झाली आहे त्यात आता हे वाळू तस्कर उतरून सर्व वाळू उपसून परत दगडगोटे खड्डे करून विद्रूप करत आहे तरी माझी ही नम्र विनंती आहे की यांना दुसरीकडे कुठे वाळू उचलायला लावून या ठिकाणची वाळू उचलू देऊ नये ही नम्र विनंती हे वाळू तस्कर बंद करा

वर्ष ११ वे | अंक २५३ वा | पाने ४ | किंमत २ रु.
संगमनेर - अकोले - कोपरगाव - रहाता - राहुरी
वार रविवार दिनांक ०९ ऑगस्ट २०२६










## विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पाठिंबा; रेल्वेसाठी कला क्रीडा साहित्य युवक व्यापारी सर्व क्षेत्रातील नागरिक एकवटले

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

नाशिक - पुणे सरळ रेल्वे मार्गे व्हावी याकरता मोठे जन आंदोलन उभे राहत असून रविवारी 9 ऑगस्ट क्रांती दिन होणाऱ्या चक्काजाम आंदोलनामध्ये लोकनेते बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे यांच्या अहवालानंतर राजकीय,सामाजिक, व्यापारी, क्रीडा, कला, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग घेतला असून हे आंदोलन नक्कीच भव्य दिव्य आणि दिशादर्शक ठरणार आहे. जन आंदोलनाच्या रेटयामुळे केंद्र व राज्य सरकारला झुकावे लागेल अशी सामान्य नागरिकांमध्ये अशा निर्माण झाली आहे.



नाशिक - पुणे सरळ रेल्वे मार्ग हा उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. मात्र महायुतीच्या सत्ताधाऱ्यांमुळे हा मार्ग बदलला गेला असून संगमनेर अकोले सह सिन्नर, नारायणगाव, चाकण, खेड, मंचर या तालुक्यांवर मोठा अन्याय झाला आहे.

हा रेल्वे मार्ग सरळ व्हावा याकरता काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सदस्य

(पान ०२ वर...)

## संगमनेर मध्ये कत्तलीसाठी जाणाऱ्या गाई व वासरांची सुटका. आयशर सह एक आरोपी अटक

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर-लोणी मार्गावरील वडगाव पान शिवारात जुन्या टोलनाक्याजवळ अवैधरीत्या गोवंशाची वाहतूक करणाऱ्या वाहनावर संगमनेर पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत ११ गाई आणि २ वासरांसह सुमारे




२५ लाख रुपये किमतीचा आयशर ट्रक असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी

(पान ०२ वर...)

## संगमनेरमध्ये मंगळसूत्र हिसकावणारे आरोपी जाळ्यात

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र व सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून पसार झालेल्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली सुमारे सहा लाख रुपये किमतीची बलेनो कारही पोलिसांनी



जप्त केली आहे. या कारवाईमुळे संगमनेर तालुक्यातील जबरी चोरीच्या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास तुळसाबाई संपत शिरसाठ, रा.

(पान ०२ वर...)








## सावकारीच्या जाचासह व्यवसायातील फसवणुकीला कंटाळून घुलेवाडीत आत्महत्या

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

घुलेवाडी येथे सावकारीचा तगादा, चक्रवाढ व्याजाचा वाढता बोजा आणि व्यवसायातील फसवणुकीच्या कथित त्रासाला कंटाळून एका व्यावसायिकाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून



संगमनेर शहर पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक केली आहे. या घटनेने संगमनेर शहर व परिसरात खळबळ उडाली आहे.

मयत नारायण सखाराम दहे

(पान ०२ वर...)








# संगमनेरमध्ये मंगळसूत्र हिसकावणारे आरोपी जाळ्यात

काकडवाडी, ता. संगमनेर, या बाहेरगावी जाण्यासाठी बसची वाट पाहत उभ्या होत्या. त्यावेळी अज्ञात व्यक्तींनी त्यांच्याजवळ येत पत्ता विचारण्याच्या बहाण्याने संवाद साधला. याचवेळी संधी साधून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व इतर दागिने जबरदस्तीने हिसकावून आरोपी पसार झाले.

या घटनेनंतर संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ४१८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०९(६) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत आरोपींबाबत महत्त्वाची माहिती मिळाली. तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. त्यानंतर हर्षल राजेंद्र भांबारे (वय २१) आणि निलेश विलास गायकवाड (वय २७), दोघेही रा. कोऱ्हाळे, ता. राहाता, यांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांच्या चौकशीत आरोपींनी गुन्ह्यासाठी बलेनो कारचा वापर केल्याचे समोर आले. त्यानुसार पोलिसांनी एमएच-१७-डीसी-४८६२ क्रमांकाची सुमारे सहा लाख रुपये किमतीची बलेनो कार जप्त केली आहे. दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी संगमनेर तालुका पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे आणि त्यांच्या तपास पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास संगमनेर तालुका पोलीस करीत असून, आरोपींचा आणखी कोणत्या गुन्ह्यांमध्ये सहभाग आहे का, याचाही तपास केला जात आहे.

# विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पाठिंबा; रेल्वेसाठी कला क्रीडा साहित्य युवक व्यापारी सर्व क्षेत्रातील नागरिक एकवटले

लोकनेते बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, मंत्री छगन भुजबळ,खासदार राजाभाऊ वाजे, खासदार डॉ.अमोल कोल्हे, खासदार निलेश लंके, माजीमंत्री आमदार माणिकराव कोकाटे, आमदार शरद दादा सोनवणे, आमदार विलास लांडे, मा.आ.डॉ. सुधीर तांबे, डॉ.जयश्रीताई थोरात यांच्यासह कलाक्षेत्रातून पद्मश्री रघुवीर खेडकर, क्रीडा क्षेत्रातून महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर, संगमनेर तालुका व्यापारी असोसिएशन, तालुक्यातील सर्व विद्यार्थी संघटना, सर्व पुरोगामी संघटना, साहित्यिक,कलावंत, शेतकरी नागरिक महिला यांच्यासह झेन जी युवक व युवतींचा मोठा सक्रिय पाठिंबा मिळत आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहरातील सर्वपक्षीय नागरिकांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला असून व्यापारी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संगमनेर तालुका व विभागासाठी ही रेल्वे किती गरजेची असून यासाठी आपल्याला संघर्ष करावा लागेल असा ठाम विश्वास मालपाणी लॉन्स येथील बैठकीत व्यक्त केला.

तालुक्यातील व परिसरातील गावांमधील कार्यकर्ते हक्काच्या रेल्वेच्या लढाईसाठी प्रचार प्रसार करत असून सिन्नर तालुका नारायणगाव तालुका अकोले खेड राजगुरुनगर मंचर आळेफाटा या विविध ठिकाणीही नागरिकांमध्ये मोठी जनजागृती करण्यात आली आहे.

रविवारी ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने आंदोलन उभे राहणार असून समृद्धी महामार्गसह नाशिक पुणे हा राष्ट्रीय महामार्ग अडवला जाणार आहे. या चक्काजाम आंदोलनाचे पडसाद केंद्र व राज्य सरकारवर पडणार असून कोणत्याही परिस्थितीत ही सरळ रेल्वे झालीच पाहिजे असा आग्रही सर्व तालुक्यातील नागरिक व रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आला आहे

**सोशल मीडिया वरूनही तरुणांचा मोठा पाठिंबा**

सोशल मीडियावर महाविद्यालयीन युवक युवती विद्यार्थी याचबरोबर तरुणांनी चक्काजाम आंदोलनाला मोठा पाठिंबा दर्शवला आहे. या आंदोलनामध्ये सहभागाची हाक दिली जात असून सत्ताधारी महायुतीच्या लोकांनी केलेली पळापळी वरही युवकांनी टीकेची झोड उठवली आहे. ज्यांच्यामुळे रेल्वे गेली तेच आता भेटीगाठी घेत असल्याची टीका छात्र भारतीचे अनिकेत घुले यांनी केली आहे.

# संगमनेर मध्ये कत्तलीसाठी जाणाऱ्या गाई व वासरांची सुटका. आयशर सह एक आरोपी अटक

निंबाळे, ता. संगमनेर येथील नजर मेहबुब शेख (वय ४६) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२.०५ वाजण्याच्या सुमारास संगमनेर-लोणी रस्त्यावर वडगाव पान शिवारातील हॉटेल रुबाबजवळील जुन्या टोलनाक्याच्या परिसरात संशयास्पद आयशर वाहन आढळून आले. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये गोवंश जातीची जनावरे अत्यंत दाटीवाटीने आणि निर्दयपणे वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.०

या कारवाईत पोलिसांनी ११ गाईंची अंदाजे ४ लाख ९५ हजार रुपये किंमत, दोन लहान गोऱ्हे/वासरांची अंदाजे ५ हजार रुपये किंमत तसेच आयशर कंपनीच्या Pro 3019 मॉडेलच्या सहा टायर वाहनाची अंदाजे २० लाख रुपये किंमत असा एकूण सुमारे २५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

प्राण्यांना निर्दयतेने वागणूक देणे अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. संगमनेर शहर पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल राहुल कैलास सारबंदे यांच्या फिर्यादीवरून नजर मेहबुब शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई संगमनेर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोलीस कॉन्स्टेबल राहुल कैलास सारबंदे आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल एस. डी. हांडे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

दरम्यान, या गोवंश वाहतुकीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच जनावरांची वाहतूक नेमकी कोठून आणि कोठे केली जात होती, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक डी. एस. महाले करीत आहेत.

# सावकारीच्या जाचासह व्यवसायातील फसवणुकीला कंटाळून घुलेवाडीत आत्महत्या

(वय ५७) यांच्या मुलगा अक्षय यांनी याबाबत शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून भास्कर फकीरा सातपुते (रा. पावबाकी, सुकेवाडी रोड), सचिन मधुकर गायकवाड (रा. घुलेवाडी फाटा), राम ऊर्फ रामा शिंदे (रा. शिवाजीनगर), शिवनाथ आव्हाड (रा. मालदाड रोड), अनिल मंडलीक (रा. रायतेवाडी) आणि शुभम हासे (रा. चिखली, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीनुसार, पत्नीच्या कर्करोगावरील उपचारांसाठी नारायण दहे यांनी विविध व्यक्तींकडून कर्ज घेतले होते. वेळेत कर्जाची परतफेड न झाल्याने त्यांच्याकडून चक्रवाढ व्याजाची मागणी केली जात असल्याचा आरोप आहे. तसेच कोरे धनादेश आणि स्टॅम्प पेपरवर स्वाक्षऱ्या घेऊन आर्थिक दबाव वाढविण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

कर्जाच्या मूळ रकमेपेक्षा व्याजाची रक्कम मोठ्या प्रमाणात वाढल्याने दहे हे मानसिक तणावाखाली होते, असा आरोप करण्यात आला आहे. त्याचबरोबर व्यवसायातील भागीदाराकडून फसवणूक झाल्याने त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या. या सर्व परिस्थितीमुळे ते नैराश्यात असल्याचे कुटुंबीयांनी पोलिसांना सांगितले.

सोमवार, ३ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास त्यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेनंतर त्यांना घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीचा पोलिसांनी तपासासाठी आधार घेतला असून, त्यातील मजकुराच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करण्यात आली. शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांच्या पथकाने कारवाई करून सहाही संशयितांना अटक केली.


**पाहिजेत**

सेल्समन जागा एक

ड्रायव्हर जागा दोन.

आकर्षक पगार देण्यात येईल

मो. 9067781068



# महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय; दहशतवादी प्रचाराशी संबंधित 114 प्रकाशनांवर बंदी



**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

दहशतवादी विचारसरणीचा प्रचार, प्रसार किंवा समर्थन करणाऱ्या साहित्याला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात दहशतवादी प्रचाराशी संबंधित असल्याचे आढळलेल्या तब्बल ११४ प्रकाशनांवर बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे अशा साहित्याची निर्मिती, प्रसार आणि वितरण यावर नियंत्रण आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. समाजात हिंसक विचारसरणीचा प्रसार होऊ नये, तरुणांची दिशाभूल होऊ नये आणि दहशतवादी संघटनांच्या प्रचाराला व्यासपीठ मिळू नये, यासाठी संबंधित यंत्रणांकडून अशा साहित्यावर लक्ष ठेवले जात आहे.

बंदी घातलेल्या ११४ प्रकाशनांमध्ये दहशतवादी विचारांचा प्रचार किंवा हिंसाचाराला प्रोत्साहन देणाऱ्या आशयाचा समावेश असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या प्रकाशनांचा प्रसार किंवा विक्री करणाऱ्यांवरही संबंधित कायद्यांनुसार कारवाई होऊ शकते.

दरम्यान, डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या साहित्याचा ऑनलाइन प्रसार रोखण्याचे आव्हानही प्रशासनासमोर आहे. सोशल मीडिया, संकेतस्थळे तसेच इतर डिजिटल माध्यमांवरून प्रतिबंधित साहित्याचा प्रसार होत नाही ना, यावर सुरक्षा यंत्रणांकडून लक्ष ठेवले जाण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयामुळे दहशतवादी प्रचाराला आळा घालण्यासाठी राज्यातील सुरक्षा यंत्रणांना अधिक प्रभावीपणे कारवाई करता येणार आहे. नागरिकांनीही संशयास्पद किंवा प्रतिबंधित साहित्याचा प्रसार न करता त्याबाबत प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# संगमनेर, श्रीगोंदा, कर्जतमध्ये अवैध धंद्यांवर गुन्हे शाखेची कारवाई

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**



अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत संगमनेर, श्रीगोंदा आणि कर्जत पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विविध ठिकाणी छापे टाकले. ६ आणि ७ ऑगस्ट रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत एकूण सात गुन्हे दाखल करण्यात आले असून, ३ लाख ४३ हजार २८० रुपये किमतीचा अवैध मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन विशेष पथके तयार करण्यात आली होती. या पथकांनी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार संबंधित परिसरात कारवाई करत अवैध धंद्यांवर छापे टाकले.

संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोमांस विक्रीच्या दोन प्रकरणांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण १ लाख ७७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत मावा विक्रीविरोधात करण्यात आलेल्या कारवाईत १ लाख १९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

तसेच श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगाराच्या तीन प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली असून १२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याच परिसरात अवैध दारू विक्रीप्रकरणी करण्यात आलेल्या कारवाईत ३३ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्व कारवायांमुळे जिल्ह्यातील अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडून अवैध धंद्यांविरोधातील कारवाई यापुढेही सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# संगमनेरात विवाह सोहळ्यांसाठी आचारसंहिता लागू झाल्याने अनेकांचे धाबे दणाणले

## फक्त डीजेच नाही तर फोटोग्राफी व लॉन्स वरही आचारसंहिता लागू

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर शहर व तालुक्यात विवाह सोहळ्यांसाठी आचारसंहिता लागू करण्यात आली यामुळे अनेकांच्या मनात हुरहुर आहे तर अनेकांचे धाबे दणाणले आहे कारण रात्री 10 नंतर डीजे बंद साडेदहाला फोटोग्राफी व अकराला लॉन्स बंद अशी कठोर आचारसंहिता असल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहे अधिक माहिती अशी की विवाह सोहळ्यांमध्ये होणारा अनावश्यक ध्वनीप्रदूषण, रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारे कार्यक्रम आणि नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता संगमनेर शहरात विवाह सोहळ्यांसाठी शिस्तबद्ध आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. 'मुहूर्त वेळेत, सोहळा शिस्तीत' या उद्देशाने विवाहस्थळे, लॉन्स आणि संबंधित व्यावसायिकांसाठी वेळेच्या मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत.

नव्या नियमानुसार विवाह सोहळ्यांमध्ये वाजविण्यात येणाऱ्या डीजे आणि ध्वनिवर्धकांवर रात्री १० वाजल्यानंतर बंदी राहणार आहे. तसेच विवाह सोहळ्यांमधील फोटोग्राफी आणि संबंधित कार्यक्रम रात्री ११ वाजल्यानंतर सुरू ठेवता येणार नाहीत. विवाह लॉन्स आणि कार्यक्रमस्थळे रात्री ११.३० वाजेपर्यंत बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विवाह समारंभ हा आनंदाचा आणि कौटुंबिक सोहळा असला तरी त्यासाठी रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात संगीत वाजविणे, वाहतूक कोंडी निर्माण होणे तसेच परिसरातील नागरिकांच्या शांततेचा भंग होणे, अशा तक्रारी वेळोवेळी समोर येत असतात. या पार्श्वभूमीवर विवाह सोहळ्यांचे आयोजन करताना वेळेचे भान ठेवणे आणि प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक करण्यात आले आहे.



या आचारसंहितेमुळे विवाह सोहळ्यांचे नियोजन वेळेत पूर्ण करण्यास मदत होणार असून, कार्यक्रम आयोजक, मंगल कार्यालये, लॉन्स चालक, डीजे व्यावसायिक आणि फोटोग्राफर यांनीही नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. विवाह सोहळ्यामुळे नागरिकांना त्रास होणार नाही, वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही आणि रात्रीच्या वेळी ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण राहील, यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान, विवाह सोहळ्यांचे आयोजन करणाऱ्या नागरिकांनी तसेच संबंधित व्यावसायिकांनी निर्धारित वेळेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर प्रशासनाकडून कारवाई होण्याची शक्यता आहे.







# हक्काच्या रेल्वेसाठी क्रांतीदिनी हजारो नागरिक रस्त्यावर उतरणार

**प्रवरातीर | वृत्तसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**




नाशिक-पुणे रेल्वे मार्गासाठी संगमनेरकरांचा लढा आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. संगमनेरला हक्काचा रेल्वेमार्ग मिळावा, या मागणीसाठी क्रांतीदिनी हजारो नागरिक रस्त्यावर उतरणार असून, नाशिक-पुणे रेल्वेसाठी चक्काजाम आंदोलन करण्याचा निर्धार नाशिक-पुणे रेल्वे कृती समितीने व्यक्त केला आहे.

नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाच्या मार्गाबाबत संगमनेर तालुक्यातील नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता आणि अपेक्षा आहे. संगमनेरमधून रेल्वे मार्ग गेल्यास परिसरातील औद्योगिक, कृषी, शैक्षणिक आणि व्यापारी क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. त्यामुळे या मागणीसाठी गेल्या काही काळापासून विविध स्तरांवर आंदोलने, निवेदने आणि जनजागृती सुरू आहे. कृती समितीच्या वतीने क्रांतीदिनी आयोजित करण्यात येणाऱ्या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. रेल्वेचा प्रश्न केवळ संगमनेरपुरता मर्यादित नसून, परिसरातील सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि नोकरदार यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचा असल्याची भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

नाशिक आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या रेल्वेमार्गामुळे प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी होण्याबरोबरच परिसरातील रोजगाराच्या संधी वाढण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे रेल्वे मार्गाच्या नियोजनात संगमनेरचा योग्य विचार करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात आहे.

दरम्यान, क्रांतीदिनी होणारे चक्काजाम आंदोलन शांततेच्या मार्गाने मात्र ठामपणे करण्यात येणार असल्याचे कृती समितीने स्पष्ट केले आहे. आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे. हक्काच्या रेल्वेसाठी सुरू असलेल्या या आंदोलनाची पुढील दिशा चक्काजामनंतर ठरविण्यात येणार असून, मागणी मान्य होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# आमदार अमोल खताळ यांचा पाठपुरावा ठरला निर्णायक

**प्रवरातीर | वृत्तसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

सन २०१५ मध्ये सुरू करण्यात आलेली आणि २०१८ पासून बंद असलेली पशुधन विमा योजना पुन्हा सुरू करण्याच्या आमदार अमोल खताळ यांच्या मागणीला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत राज्यात पशुधन विमा योजना पुन्हा राबविण्यास मंजुरी दिली असून, या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी आणि पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.




मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार अमोल खताळ यांनी पशुधन विमा योजनेचा मुद्दा प्रभावीपणे मांडत शासनाचे लक्ष वेधले होते. पिकविमा योजनेच्या धर्तीवर पशुधनासाठीही विमा संरक्षण उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी कुटुंबांच्या उत्पन्नाचा प्रमुख आधार पशुपालन असल्याने जनावरांच्या मृत्यूमुळे होणारे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी विमा योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी त्यांनी केली होती.


जवळपास आठ वर्षांपासून योजना बंद असल्याने या काळात अनेक पशुपालकांना जनावरांच्या मृत्यूमुळे मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले. शेतकरी आणि पशुपालकांच्या या अडचणी लक्षात घेऊन आमदार खताळ यांनी हा विषय सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणून दिला. त्यांच्या पाठपुराव्याची दखल घेत शासनाने अखेर पशुधन विमा योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत गाई, म्हशी, बैल, रेडे, शेळ्या आणि मेंढ्या यांना विमा संरक्षण मिळणार आहे.

# सुकेवाडीत धाडसी घरपोडी सुमारे 7 धुळे सोने चे दागिने लंपास

**प्रवरातीर | वृत्तसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**



संगमनेर शहर पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या सुकेवाडी येथील अंग्रेश्वर मळा भागातील विठ्ठल शिंदे यांच्या घरी घरफोडी करून अज्ञात चोरट्यांनी सुमारे साततोडे सोने अंदाजे किंमत दहा लाखाचे वर चोरून नेले असल्याची तक्रार संगमनेर शहर पोलीस ठाणे येथे दाखल केली आहे यामुळे परिसरात खळबळ उडाली असून या घटनेने भीतीचे वातावरण पसरले आहे ही घटना दिनांक सात ऑगस्ट रोजी घडली आहे पोलिसांनी जागेवर जाऊन पंचनामा केला आहे अधिक तपास सुरू आहे

दरम्यान संगमनेर शहरातील सुकेवाडी परिसरात भरदिवसा घरफोडी करून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा तब्बल ९ लाख २ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना ७ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी भानुदास शिंदे (वय ५३, व्यवसाय शेती, आडश्वर मळा, सुकेवाडी, ता. संगमनेर) यांच्या फिर्यादीवरून संगमनेर शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या अहवालानुसार, ७ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन ते चार वाजण्याच्या दरम्यान आडश्वर मळा, सुकेवाडी येथील फिर्यादी यांच्या राहत्या घरात अज्ञात व्यक्तीने प्रवेश केला.

# नाशिक-पुणे रेल्वेवरून पालकमंत्री विखे यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध

**प्रवरातीर | वृत्तसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

नाशिक-पुणे रेल्वे मार्गाच्या प्रश्नावर राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केलेल्या वक्तव्याचा नाशिक-पुणे रेल्वे कृती समितीने तीव्र शब्दांत निषेध नोंदविला आहे. या वक्तव्यामुळे संगमनेर तालुक्यासह परिसरातील नागरिकांच्या भावना दुखावल्याचा दावा समितीने केला असून, पालकमंत्र्यांनी आपल्या वक्तव्याबाबत तातडीने स्पष्टीकरण देऊन संगमनेरकरांची दिलगिरी व्यक्त करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

कृती समितीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनानुसार, नाशिक-पुणे रेल्वे हा लाखो नागरिकांच्या विकासाशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. या प्रकल्पाच्या मार्गाबाबत तांत्रिक, आर्थिक आणि भौगोलिक बाबींचा विचार करून निर्णय होणे आवश्यक असताना, या गंभीर विषयाला धार्मिक स्वरूप देणे योग्य नसल्याचे समितीने म्हटले आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या 'शिर्डी रेल्वेला विरोध करणाऱ्यांवर साईबाबा कोपतील' या आशयाच्या वक्तव्यावर समितीने आक्षेप




घेतला आहे. अशा प्रकारची भाषा लोकशाही मूल्यांना धरून नसून, मतभिन्नता असलेल्या नागरिकांवर अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न असल्याची टीका समितीने केली आहे. साईबाबांनी श्रद्धा आणि सबुरीचा संदेश दिला असून, त्यांच्या नावाचा वापर करून नागरिकांना इशारा देणे योग्य नसल्याचेही समितीने स्पष्ट केले.

संगमनेरकरांची भूमिका कोणत्याही धार्मिक स्थळाच्या किंवा शहराच्या विरोधात नसून, नाशिक-पुणे रेल्वे मार्गाच्या बाबतीत संगमनेरला न्याय मिळावा आणि तांत्रिकदृष्ट्या योग्य मार्ग निश्चित व्हावा, अशीच असल्याचे समितीने सांगितले.

पालकमंत्र्यांनी वक्तव्याबाबत स्पष्टीकरण न दिल्यास जनआंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कृती समितीने दिला आहे. निवेदनावर समितीचे समन्वयक सतीश खताळ यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे सायं. दैनिक प्रकाशक, प्रिंटर्स संपादक श्री. शिवपालसिंह प्रतापसिंह ठाकूर यांनी प्रवरा प्रिंटींग प्रेस, घोडेकर मळा, संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ.नगर (महाराष्ट्र) येथे छापून याच ठिकाणी कार्यालयात प्रकाशित केले. पी.आर.बी. कायद्यानुसार अंकात प्रसिध्द केलेल्या मजकुराची जबाबदारी यांचेवर राहील. मालक संपादक धिरजसिंह शिवपालसिंह ठाकूर, मो ९९७०९९८३९९ संगमनेर न्यायकक्षेत